रजिस्टर:

जा.क्र.माध्य-३/१४/नमाशा/मान्यता/पुणे
शिक्षण उपसंचालक,पुणे यांचे कार्यालय,
दि.

2 NOV 1989

प्रति,
मा.सचिव,
श्री.खंडेराय प्रतिष्ठाण बालेवाडी,
पो.बाणेर ता.हवेली जि.पुणे.

विषय :- सन. १९८९ या शै.वर्षात नविन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :- शासनाचे पत्र क्र.एसएसएन/१०८९/२०२०/माशि-१ दि.२९.९.८९.

महाशय,

शासनाचे संदर्भाधिन पत्रान्वये खाली नमूद केलेल्या आपल्या शाळेत मराठी / ~~इंग्रजी~~ माध्यमातून जून १९८९ पासून विना अनुदान / ~~कायम विना अनुदान~~ तत्वावर विशेष बाब म्हणून नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

| अ.न. | शाळेचे नांव व ठिकाण | माध्यम | इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | बालेवाडी ता.हवेली | मराठी | इ.८ वी | विना अनुदान तत्वावर |

सदर संस्थानां अनुदान संहितेच्या नियमानुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्याच्या शर्तीवर नवीन शाळा सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे.

अ] या नविन माध्यमिक शाळांना [इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त ] शासन निर्णय क्र. एसएसएन/१०८८/१६६९ /एन-माशि-१ दि. १०.२.८९ अन्वये विहीत केलेल्या नवीन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

२...

ब] सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे [उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशा बाबत इ.] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

क] सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

ड] इंग्रजी माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही वा आर्थिक-दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [ई.बी.सी.च्या] फीच्या परताव्याची मागणी करता येणार नाही. अशा आशयाचे आपल्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमीपत्र तयार करून या कार्यालयास पाठवावे.

तरी वर नमूद केलेल्या अटीची पुर्तता करून नवीन शाळा सुरु करण्या-बाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद ----पुणे यांचे मार्फत या कार्यालयास पाठवावा.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही असे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

१] मा. अवर सचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२ यांना सादर.
२] मा. शिक्षण संचालक, म.रा. पुणे-१ यांना माहितीसाठी सादर.
३] शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद- पुणे यांना माहितीसाठी व त्वरित कार्यवाहीसाठी रवाना.

२/- त्यांना विनंती की त्यांनी वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देऊन शाळेने वर नमूद केलेल्या त्रुटी केलेल्या आहेत की, नाही याची खात्री करून घ्यावी. तसेच शासनाचे संदर्भाधिन पत्रात परि.३ मध्ये नमूद केलेल्या १ ते ४ मुद्यांचा अहवाल १५ दिवसांचे आत या कार्यालयास पाठवावा.